६७८।१

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ निवडणूक खर्च हिशोब/ ५४६४ /२०१६ दिनांक : /०९/२०१६. 20/09/16

विषय :- निवडणूक खर्चाचे हिशोब विहीत मुदतीत पूर्ण करणेबाबत

संदर्भ :- १.या प्राधिकरणाकडील परिपत्रक जा.क्र.१५३३/२०१५, दिनांक ०४/०२/२०१५.
२. या प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र.८११३/२०१५, दिनांक ०१/१०/२०१५.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब मधील तरतूदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्था समिती सदस्यांच्या व तिच्या पदाधिका-यांच्या निवडणूका घेण्याकरीता राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर संस्थांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणेकरीता आवश्यक असणारा निवडणूक निधी संस्थेकडून घेण्याचे अधिकार प्राधिकरणास प्राप्त आहेत. प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरणाने संबंधित जिल्हा / प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना प्राधिकरणाच्या नावाने खाते उघडण्याची परवानगी देऊन प्राधिकरणाने निर्धारित केलेला निवडणूक निधी जमा खर्च करण्यास अनुमती दिलेली आहे. तसेच प्राधिकरणाने संदर्भ क्रमांक १ च्या आदेशानुसार निवडणूक खर्चाचा हिशोब विहीत नमुन्यात ठेवण्याबाबत संबंधितांना आदेशीत केलेले आहे. त्याचप्रमाणे प्राधिकरणाने संदर्भ क्रमांक २ च्या आदेशानुसार निवडणूक प्रक्रिये दरम्यान जमा होणारा निवडणूक निधी व उमेदवार अनामत ठेव रक्कम यांचे हिशोब विहीत कालमर्यादेत पूर्ण करणेबाबत आदेशीत केलेले आहे. हया पार्श्वभूमीवर निवडणूक पूर्ण संस्थांचे हिशोब संदर्भ क्रमांक २ अन्वये विहीत मुदतीतपूर्ण होऊन जिल्हा / प्रभाग / तालुका निवडणूक निर्णय अधिकारी यांचा संस्था निहाय अहवाल प्राधिकरणास प्राप्त होणे क्रमप्राप्त असताना जिल्हा / तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचेकडून उक्त नमूद कृती झालेली नाही व त्यां च्या खात्यावर मोठया प्रमाणावर निवडणूक निधीच्या रकमा शिल्लक असल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेले आहे. सदर बाब गंभीर असून कर्तव्यात कसूर करणारी आहे. सबब या बाबत खालील प्रमाणे आदेश पारित करणेत येत आहेत.

## आदेश

महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (५) अन्वये प्राप्त अधिकारानुसार प्राधिकरण ज्या संस्थांचे दिनांक २०/०९/२०१६ पर्यंत निवडणूक निकाल जाहिर झाले आहे त्या सर्व संस्थांच्या निवडणूक खर्चाचे हिशोब पूर्ण करणेबाबत खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. संबंधित जिल्हा /तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांनी सहकारी संस्थेने जमा केलेल्या निवडणूक निधीपेक्षा निवडणूक खर्च कमी झाला असल्यास खर्च वजा जाता उर्वरित निवडणूक निधी रेखांकित धनादेशाद्वारे संबंधित संस्थेस या आदेशाचे दिनांकापासून सात दिवसात परत करावा.

२. ज्या सहकारी संस्थांच्या निवडणूक अविरोध झाल्या आहेत, अशा संस्थांचे बाबतीत निवडणूक खर्च वजा जाता उर्वरित निधी रेखांकीत धनादेशाद्वारे संबंधित संस्थेस या आदेशाच्या दिनांकापासून सात दिवसात परत करावा.

३. वाढीव निवडणूक खर्चाचे प्रस्ताव प्राधिकरणास सादर झाले असल्यास अथवा करावयाचे असल्यास अशा संस्थांबाबत

(i) जर प्राप्त निवडणूक निधी + संस्थेने परस्पर केलला खर्च+ उमेदवारी अर्ज विक्रीची रक्कम = प्राप्त निवडणूक निधीची रक्कम प्रस्तावित केलेल्या वाढीव खर्चापेक्षा जादा असल्यास प्राप्त निधी रकमेतून प्रस्तावित खर्च वजा जाता उर्वरित रक्कम या आदेशाचे दिनांकापासून सात दिवसाच्या आत रेखांकित धनादेशाने संस्थेस परत करावी.त्यासाठी प्राधिकरणाचे वाढीव खर्च मंजुरी आदेशाची वाट पाहू नये.

उदा. प्राप्त निवडणूक निधी रू.१० लाख वजा प्रस्तावित केलेला वाढीव खर्च रू. ८ लाख = रू.२ लाख प्राधिकरणास वरील खर्च मंजुरी प्रस्ताव सादर करतानाच अशा सर्व संस्थांचा निधी परत करावा.

४. उमेदवार ठेव अनामत रक्कम ही संबंधित उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिका-याने ७ दिवसात परत करावी व परत केल्याचा पुरावाही प्राधिकरणास सादर करावा.

उपरोक्त चार बाबींचा अनुपालन अहवाल प्राधिकरणास दिनांक १०/१०/२०१६ पूर्वी संस्था निहाय सादर करावा

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने.**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
**सचिव,**
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य ,पुणे .